# समिती दर्पण

सप्टेंबर २०२५

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात १२०० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# विद्यार्थ्यांचे स्वास्थ्य राखणारे समितीचे आरोग्य केंद्र

**समितीच्या वसतिगृहात राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्वतंत्र आऱोग्य केंद्र चालविले जाते. आजारी विद्यार्थ्यांची चिकित्सा आणि उपचारांबरोबरच, आहार, विहार, व्यायामाबाबत मार्गदर्शनही या केंद्रामार्फत केले जाते. समितीच्या सर्व वसतिगृहांमधील सर्व विद्यार्थ्यांची वार्षिक आऱोग्य तपासणीही केली जाते. या आऱोग्य केंद्राच्या कामकाजाविषयी...**

**डॉ. अभय व्यवहारे**



विद्यार्थी साहाय्यक समितीच्या अनेक उपक्रमांपैकी आरोग्य केंद्र हा एक अतिशय महत्त्वाचा आणि आवश्यक असलेला उपक्रम आहे. या अंतर्गत समितीमध्ये रोज दोन तास डॉक्टर येऊन आजारी विद्यार्थ्यांना तपासतात, औषधोपचार करतात, त्याचबरोबर वर्षातून एकदा सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाते.

समितीचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. विद्यार्थ्यांची संख्याही बाराशेच्या घरात जाऊन पोहोचली आहे. अर्थात त्यामुळे आरोग्य केंद्राचे काम पण वाढले आहे. वसतिगृहात प्रवेश घेतल्यावर प्रत्येक मुलाची/ मुलीची सर्वात प्रथम आरोग्य तपासणी केली जाते. आरोग्य तपासणी करताना वर्षानुवर्षांच्या अनुभवावरून काही निकष ठरविले आहेत. यातील महत्त्वाच्या गोष्टी म्हणजे मुलांच्या कुटुंबात असलेले आजार (family history), अनुवंशिक आजार इत्यादी माहिती करून घेणे, गरज लागल्यास त्यांच्या पालकांना फोन करून त्याबद्दल विस्तृत माहिती घेणे, मुलांना स्वतःला आत्तापर्यंत झालेले विशेष आजार काही असतील तर त्याची नोंद करून घेणे. ही सर्व माहिती त्या मुलाच्या भविष्यातील वसतिगृहातील निवासामध्ये तो आजारी पडल्यास उपयोगी पडते.

## आहार- विहाराबाबत मार्गदर्शन

मुलांची/ मुलींची आरोग्य तपासणी करताना त्यांचे वजन, उंची, BMI पाहिले जाते. वजन जर नॉर्मल वजनापेक्षा कमी अगर जास्त आढळले तर आहार, विहार आणि व्यायाम याबद्दल मार्गदर्शन केले जाते. बाहेर उघड्यावरचे पदार्थ, फास्ट फूड, जंक फूड न खाता फळे, सॅलड, सुकामेवा हे पदार्थ खावेत, असा सल्ला देतो. रक्तदाब कमी असेल तर आणि एरवी सुद्धा पिण्याच्या पाण्याचे प्रमाण हे योग्य असले पाहिजे, हे त्यांना सांगितले जाते.

मागील दोन- तीन वर्षांपासून समितीच्या आरोग्य केंद्रातच हिमोग्लोबिन तपासण्याची व्यवस्था केली आहे. हिमोग्लोबिन कमी असले तर त्याच्या प्रमाणानुसार औषधे- गोळ्या दिल्या जातात. हिमोग्लोबिन वाढविणाऱ्या पदार्थांचे सेवन आहारामध्ये करण्याचे महत्त्व पटवून दिले जाते.

## त्वचारोगाबाबत विशेष काळजी

तपासणी करताना त्वचारोग आढळले, तर त्याबद्दल आवश्यक ते उपचार केले जातात आणि प्रसंगी त्यांना त्वचारोगतज्ज्ञांकडे पाठवले जाते. संसर्गजन्य त्वचारोगांबाबत विशेष काळजी घेऊन त्या मुलांना त्या आजारानुसार काही दिवस घरी पाठवले जाते. संसर्गजन्य त्वचारोगाची माहिती देणारे माहितीपत्रक सुद्धा दिले जाते. प्रसिद्ध त्वचारोगतज्ज्ञ डॉ. विद्यासागर घाटे हे समितीच्या मुलांची विनामूल्य तपासणी करून उपचार करतात.

डोळे आणि दात तपासून आवश्यकतेनुसार त्या त्या तज्ज्ञांकडे पुढील उपचारांसाठी पाठवण्यात येते. त्यासाठी कमी खर्चात, परंतु चांगले उपचार कोठे मिळतील, याबाबत मार्गदर्शन केले जाते. प्रत्येक मुलाला वर्षातून दोन वेळा जंतनाशक गोळ्या दिल्या जातात.

## मुलींसाठी समुपदेशन कार्यक्रम

रोटरी क्लबतर्फे विद्यार्थिनींसाठी अस्मिता फाउंडेशनबरोबर मानसिक आरोग्य आणि समुपदेशन हा कार्यक्रम राबविण्यात येतो. आहारतज्ज्ञ आणि स्त्रीरोग तज्ज्ञ यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले जाते. त्यांच्या दैनंदिन मानसिक अडचणींवर समुपदेशन केले जाते. आरोग्य केंद्रात मदतनीस म्हणून समितीमधील विद्यार्थी किंवा विद्यार्थिनी काम करतात.

# कौशल्यविकासाची कार्यशाळा

## ‘रोबोटिक्स’बरोबरच ‘कमवा- शिका’ही

हैदराबाद येथील सोहम अकॅडमी ऑफ ह्युमन एक्सलन्स यांच्या सहकार्याने समितीत २१ सप्टेंबर रोजी रोबोटिक्स कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी नंतर पाच शाळांमध्ये जाऊन सुमारे पाचशे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.

समितीचे कार्यकर्ते हेमंत राजहंस व शुभांगी चिरपूटकर हे या कार्यशाळेचे प्रमुख समन्वयक होते. खजिनदार संजय अमृते यांनी कार्यशाळेत दिवसभर उपस्थित राहून मार्गदर्शन केले. यावेळी रचना फाऊंडेशनचे दिनेश पांडे उपस्थित होते. कार्यशाळेत दोन प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना रोबोटिक्सची ओळख करून दिली. यात Arduino, सेन्सर्स, IoT तंत्रज्ञान याबद्दल माहिती दिली व एकूण २१ हँड्स- ऑन प्रोजेक्ट ॲक्टिव्हिटी करून घेतल्या.

कार्य़शाळेत शेवटी विद्यार्थ्यांना ‘कमवा आणि शिका’ योजनेची माहिती देण्यात आली. गेल्या वर्षी समितीत झालेल्या कार्यशाळेनंतर विद्यार्थ्यांनी पाच शाळांमध्ये प्रशिक्षण दिले. प्रत्येक शाळेत समितीच्या १२ विद्यार्थ्यांचा गट गेला. एकूण सुमारे ५०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. यंदा त्याच पाच शाळांमध्ये पुनःप्रशिक्षण देण्यात आले आणि ५ नवीन शाळाही जोडल्या गेल्या. २३ सप्टेंबर रोजी समितीच्या ६० विद्यार्थ्यांनी या पाच शाळांमध्ये जाऊन पाचशे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. ही कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्यविकासाबरोबरच संवादकौशल्य, संघटनकौशल्य आणि नेतृत्वगुण वाढविणारी ठरली.





# आर्थिक समृद्धीसाठी राहा सकारात्मक

## पद्मभूषण डॉ. ज्येष्ठराज जोशी यांचा विद्यार्थ्यांना सल्ला

‘आर्थिक समृद्धीचे मार्ग प्रामुख्याने विज्ञान–तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपलब्ध होतात. विज्ञान–तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी समतोल समाज गरजेचा असतो. समाजाचा समतोल व्यक्तींच्या मनाची एकाग्रता, सकारात्मकता आणि आनंदी मनोवस्थेवर अवलंबून असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सकारात्मक, एकाग्र आणि आनंदी असावे', असे प्रतिपादन मराठी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष, प्रख्यात रासायनिक अभियंता, अणुशास्त्रज्ञ आणि अध्यापक पद्मभूषण डॉ. ज्येष्ठराज जोशी यांनी केले.

समितीच्या वतीने २६ सप्टेंबर रोजी डॉ. जोशी यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर उपस्थित होते.

यावेळी 'हवामान बदल, तापमानवाढ–अभिनव संशोधन आणि सर्जनशीलता' या विषयावर डॉ. जोशी यांनी मार्गदर्शन केले. रंगीत पारदर्शिकांच्या साह्याने त्यांनी विषयाची मांडणी केली. जागतिक तापमानवाढीचे संकट घोंघावत आहे. कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू यांच्यामुळे सर्वाधिक प्रदूषण होते. कार्बन उत्सर्जन कमी करणे, हाच उपाय आहे. मात्र, वास्तवात हे प्रदूषणकारी घटक अधिकाधिक वापरले जात असल्याचे डॉ. जोशी यांनी सांगितले.

डॉ. ज्योती गोगटे यांनी व्याख्यानविषयाची माहिती दिली. मराठी विज्ञान परिषदेच्या विश्वस्त शशीताई भाटे यांनी परिषदेच्या उपक्रमांची माहिती दिली. पल्लवी भोसले यांनी परिचय करून दिला. अमोल झीरमिले यांनी सूत्रसंचालन केले. परिषदेचे विनय र. र. यांनी आभार मानले.

> सध्या देशातील उद्योग, सेवा, शेती आणि शैक्षणिक या प्रत्येक क्षेत्राचा सूर सदैव तक्रारीचा असतो आणि तक्रारी करणारा देश कधीच प्रगती करू शकत नाही. तक्रारीचे सूर बंद करण्यासाठी एकाग्रता वाढवा, सकारात्मक राहा. तक्रारखोर माणसे कुठलीही नवनिर्मिती करू शकत नाहीत
>
> **- डॉ. ज्येष्ठराज जोशी,**
> अध्यक्ष, मराठी विज्ञान परिषद

# जर्मन भाषा शिक्षणाच्या एकाच वेळी दोन बॅच




विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर भाषाकौशल्य वृद्धीचे नवे दार खुले करून देण्याच्या उद्देशाने समितीत परकी भाषा वर्ग चालविले जातात. विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमांतर्गत नुकतेच एकाच वेळी दोन ठिकाणी जर्मन A1 लेव्हलचे वर्ग सुरू झाले. विशेष म्हणजे दोन्ही बॅच पूर्ण क्षमतेने भरल्या असून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद उल्लेखनीय ठरला आहे. विद्यार्थ्यांचा उत्साह लक्षात घेऊन आता जर्मन A2 लेव्हलचे वर्ग तत्काळ सुरू करण्यात येणार आहेत.यासोबतच २७ सप्टेंबरपासून जपानी भाषेच्या N5 लेव्हलची बॅचदेखील सुरू झाली आहे.



तयाचा वेलू...

# शेताचे डॉक्टर



“शेती ही कुठल्याही इतर इंडस्ट्रीप्रमाणेच चालवली पाहिजे; तरच मातीतून पैसे काढता येतात!” ७२ वर्षांचे, ऑरगॅनिक केमिस्ट्रीमध्ये पीएच.डी. मिळविलेले, व्यवसायाने शेतकरी, अनुभवाने इंजिनीअर, विचाराने व्यावसायिक असलेले डॉ. विलास काळे आपल्या अनुभवाचे सार एका वाक्यात सांगतात.

भीमाशंकरजवळच्या घोडेगावातील बालपण. डॉक्टर शाळेत कायम पहिले, स्कॉलरशिप मिळविलेले. जिल्हा परिषद शाळेतल्या शिक्षकांचे त्यांना आणि त्यांचे शिक्षकांना खूप कौतुक. गावातल्या शाळेत शिकवणाऱ्या पण मूळ पुण्यातल्या त्यांच्या शिक्षिका सीता कुलकर्णी यांनी त्यांना वेळेचा सदुपयोग करायला शिकविले. चालता चालता शब्द पाठ करायचे, शेतावर राखण करताना बांधावर बसून मनातल्या मनात विषयांची उजळणी करायची. त्यांनीच डॉक्टरांना पुढील शिक्षणासाठी पुण्याचा रस्ता दाखविला.

दहावीत असताना ते पुण्यात आले. दोन वर्षे ते अनाथ विद्यार्थी गृहात राहिले. (आताचे पुणे विद्यार्थी गृह) त्या दोन वर्षांत पुण्यात फिरताना त्यांना विद्यार्थी साहाय्यक समितीचा शोध लागला. ते म्हणतात, “तेव्हा लजपत हॉस्टेल नवीन होते. नवी इमारत, स्वच्छ, भरपूर उजेड असलेल्या खोल्या, झोपायला कॉट आणि गादी, अभ्यासाला टेबल आणि टेबल लॅम्प.. सगळी “पॉश” व्यवस्था होती. मला फर्ग्युसन कॉलेजला अडमिशन मिळाली होती. १९७० ते १९७६ मी ‘लजपत’मध्ये राहिलो.”

समितीच्या कितीतरी स्वयंसेवकांचा त्यांनी आवर्जून उल्लेख केला. अच्युतराव आपटे, यादवराव कुलकर्णी, निर्मलाताई पुरंदरे, प्रकाश अकोलकर सर, रेक्टर कॅप्टन नांगरे...

अच्युतरावांच्या खूप आठवणी त्यांनी सांगितल्या. “सरांनी मला काम सांगितले, की ते त्यांना पसंत पडेल, असेच करायचो. एकदा त्यांनी मला कॅम्पमध्ये पाठवले. एक गृहस्थ एक पाकीट देतील ते घेऊन ये म्हणाले. मी गेलो, मिळालेले पाकीट आणून त्यांच्या हवाली केले. 'काय आहे पाकिटात माहिती आहे का तुला?' अच्युतरावांनी विचारले. मी नाही म्हणालो. त्यांनी माझ्यासमोर पाकीट उघडले. त्यात त्या गृहस्थांनी समितीला दिलेली एक लाखाची देणगी होती. रोख रक्कम! त्याकाळी आम्हाला एकावेळी दहा रुपयेसुद्धा दिसायचे नाहीत. एवढे पैसे बघण्याचा अनुभव अविस्मरणीय होता. इतक्या विश्वासाने ते आपल्याला काम सांगतात, याचा अभिमान वाटायचा.”

रेक्टर नांगरे सर कुठे काही अस्वच्छता दिसली तर स्वतः साफ करून दाखवायचे. मग आपण ते काम न करण्याची लाजच वाटायची. यादवराव कुलकर्णी सरांमुळे समितीच्या खूप उपक्रमांत भाग घेतला आणि त्यातून खूप शिकायला मिळाले. निर्मलाताईंमुळे एका फ्रेंच गृहस्थांबरोबर त्यांच्या पीएच.डी.साठी काम करायची संधी मिळाली.

सांगितलेले काम मनापासून करायचे आणि समितीच्या सगळ्या उपक्रमांत मनापासून भाग घ्यायचा, ह्या गुणांमुळे मी समितीत सगळ्यांचा लाडका होतो, असे त्यांनी अभिमानाने सांगितले. फर्ग्युसनसारख्या elite (हा त्यांचाच शब्द) कॉलेजमध्ये इंग्रजी न येणाऱ्या, ग्रामीण मराठी बोलणाऱ्या, शर्ट- पायजमा घालणाऱ्या मुलाची टिंगल नक्कीच झाली. पण मी वर्गात उत्तरे द्यायचो आणि हुशार मुले शिक्षकांना आवडतात. ग्रामीण भागातल्या हुशार मुलांना सगळे जीव लावायचे, असे ते म्हणाले.

डॉक्टरांनी बी.एस्सी., एम.एस्सी. केले. दोन्ही वेळा ते विद्यापीठात पहिले आले. परीक्षा झाल्याच्या दुसऱ्या दिवशीच त्यांना दाईइची कारकेरिया कंपनीत नोकरी लागली आणि रिझल्ट लागेपर्यंत त्यांना दोन महिन्यांचा पगार मिळाला होता. पहिल्या महिन्याचा पूर्ण पगार त्यांनी समिती आणि अनाथ विद्यार्थी गृहाला दिला.

पुढे त्यांनी कॅनडामधून ऑरगॅनिक केमिस्ट्री या विषयात पीएच.डी. केली. Best student of last five years हा किताब पटकावून ते तिथेही टॉपर राहिले. अल्बर्ट हेरिटेज फाऊंडेशनची पोस्ट डॉक्टरेटसाठी मिळणारी शिष्यवृत्तीही त्यांना मिळाली.

देशासाठीच काम करायचे हे ठरवून ते भारतात परत आले. केमिकल इंडस्ट्री काढण्याचा त्यांचा मानस होता. पण आर्थिक पाठबळ नव्हते. मग त्यांनी पारंपरिक व्यवसायातच पण विचारपूर्वक हात घातला. परदेशी राहिल्यामुळे काही नव्या भाज्यांशी ओळख झाली होती. सुरुवातीला ब्रोकोली लावली. युरोप, चीन, मेक्सिको, जपान, कोरिया, थायलंड ह्या विविध देशांच्या कुझिन्समध्ये लागणाऱ्या दीडशे प्रकारच्या परदेशी भाज्या, हर्बस् आणि फुले त्यांनी पिकविली. भारतातील पहिली Red And Yellow capsicaum पिकविण्याचा मान त्यांच्या नावावर जमा आहे.

त्यांच्या यशाची काही सुत्रे त्यांनी सांगितली. गुणवत्ता आणि सातत्य हे सगळ्यात महत्त्वाचे तत्व. त्यासाठी लागणारी शिस्त. नाव कमवायचे आणि टिकवायचे असेल तर कधी काय पिकेल आणि बाजारात जाईल याचे नियोजन, त्यासाठी पूर्वतयारी, पेरणी, मशागत, काढणी आणि बाजारात पोचणे, सगळे जमवायलाच लागते. पुरवठा नियमित हवा. त्यासाठी त्यांनी कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगचीही पहिल्यांदा सुरुवात केली. आपल्याकडची शेते लहान, त्यामुळे ऑटोमेशन करता येत नाही आणि मोठ्या प्रमाणात उत्पादनही घेता येत नाही, ही त्यांची खंत आहे.

इथे त्यांच्या पहिल्या वाक्याचा संदर्भ आहे. जसे एखाद्या फॅक्टरीचा मालक पुरवठा साखळी तयार करेल आणि सांभाळेल, तसे शेतीत झाले पाहिजे. स्पर्धेला तोंड देण्यासाठी, ग्राहकाच्या मागणीप्रमाणे उत्पादनात बदल करीत राहिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

**(शब्दांकन : माधवी कुलकर्णी)**

# माहेरवाशिणींनी दिला आठवणींना उजाळा

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या माजी विद्यार्थिनींचा दहावा माहेरमेळावा १४ सप्टेंबर रोजी उत्साहात झाला. समितीतील वास्तव्यातील आठवणींना उजाळा देत माहेरवाशिणींच्या गप्पांची मैफल यानिमित्ताने रंगली.

मनीषा गोसावी यांच्या कल्पक मार्गदर्शनाखाली काही माजी विद्यार्थिनी, विदयार्थी आणि आजी विद्यार्थिनींनी फुले, पाने आणि फुलांच्या पाकळ्यांचा वापर करून प्रवेशद्वार, सगळा परिसर, सभागृह अतिशय आकर्षकरित्या सजविले होते. मेळावा खर्च निधी दिलेल्या




विद्यार्थिनींच्या नावांचा फलक प्रवेशद्वाराशी सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

मनीषा गोसावी यांनी प्रास्ताविक केले. माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे यांनी मंडळाचे उपक्रम आणि पुढील दिशा, उद्दिष्टांबद्दल माहिती सांगितली. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी समितीचे उपक्रम आणि पुढील दिशा याबद्दल मनोगत व्यक्त केले. विश्वस्त विनया ठोंबरे आणि अलकनंदा पाटील यांनी मुलींशी संवाद साधला. माजी विद्यार्थिनी जान्हवी जोगळेकर यांनी समितीमधील एका विद्यार्थिनीचा उद्योजक बनण्याचा प्रवास सांगितला. ॲड. प्रार्थना सदावर्ते यांच्या निवेदनाच्या साथीने सत्कार सोहळा झाला. स्वतःच्या दैनंदिन जबाबदाऱ्या सांभाळत आणि सामाजिक बांधिलकी जपत, आपापल्या क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थिनींचा मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. अहिल्यानगरच्या वसतिगृहाच्या समितीच्या कार्यकर्त्या व माजी विद्यार्थिनी सुनीता झिंजाड यांनी वसतिगृहांची माहिती दिली. यावेळी त्यांनी सायकलींची गरज अधोरेखित केली. लगेचच माधुरी नाईक यांनी चार सायकलींसाठी आर्थिक मदत जाहीर केली. खेळ, संगीत खुर्ची, गप्पागोष्टी या सत्रामध्ये अनिता देशपांडे यांच्या खुमासदार निवेदनाने रंगत भरली. अखेरीस सर्वांनी सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला.

या मेळाव्याला समितीचे कायम विश्वस्त तुकाराम गायकवाड, माजी विश्वस्त सुप्रिया केळवकर, माजी पर्यवेक्षिका उज्ज्वला माटे आदी उपस्थित होते. निवेदन स्मिता कुलकर्णी यांनी केले. आभार सुनीता पाटील यांनी मानले.




*माजी विद्यार्थी मंडळामार्फत १०० रोपांची लागवड करण्याचा उपक्रम राबिवण्यात आला. या उपक्रमास माजी विद्यार्थी मंडळाचे पदाधिकारी, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, प्रदीप मांडके, वनविभागाचे वनरक्षक कृष्णा हाक्के, वनरक्षक ऋतुजा बोराडे व समितीचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.*

# माजी विद्यार्थ्यांनी उलगडली उद्योजकतेची यशोगाथा

वादविवाद स्पर्धा, अभियंत्रिकी शाखांविषयी विचारमंथन, इंजिनिअरिंग वॉल ऑफ फेम अंतर्गत स्टार्टअप आयडिया, प्रॉब्लेम- सोल्युशन, प्रोजेक्ट आणि पोस्टर प्रेझेंटेशन अशा विविध उपक्रमांनी समितीच्या मुलींच्या नवीन वसतिगृहात २८ सप्टेंबरला अभियंता दिवस साजरा झाला. पहिल्या सत्रात अभियंत्रिकी आणि सामाजिक संदेश असलेला लघुपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.

दुसऱ्या सत्रात प्रमुख पाहुणे पवन दळवी यांनी वयाच्या अठराव्या वर्षी पेटंट कसे मिळविले, याची यशोगाथा उलगडली. डॉ. रवींद्र राजहंस यांनी इनोव्हेशन व स्टार्टअप संकल्पना व त्यांचा शतकभराचा अभियांत्रिकी प्रवास सोप्या भाषेत सांगितला.

अभियांत्रिकी क्षेत्रात वेगळा ठसा उमटविणारे समितीचे माजी विद्यार्थी जे. व्ही. ऊर्फ राजू इंगळे, दत्तात्रय ढोकरे, सुनील चोरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. आपल्या उद्योजकतेच्या प्रवासात समितीच्या संस्कारांचा मोठा वाटा असल्याचे या सर्वांनी नमूद केले. या कार्यक्रमाचे आयोजन इंजिनिअरिंग क्लबच्या विद्यार्थ्यांनी केले.



कोणत्याही व्यवसायात यशस्वी होण्यासाठी मनात आग असली पाहिजे. याच आगीच्या जोरावर विपरीत परिस्थितीतही यशस्वी होता येते. विद्यार्थ्यांनो, तुम्ही याच मार्गाने पुढे जा.

\- **प्रतापराव पवार,** अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती



## डॉ. कोपरकर दांपत्याने घेतला टीम बिल्डिंग मास्टर क्लास

समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्या संकल्पनेतून गुणवत्ता सुधार उपक्रमांतर्गत ११ व १२ सप्टेंबर रोजी ‘टीम बिल्डिंग मास्टर क्लास’ कार्यशाळा घेण्यात आली. डॉ. विनय आणि सौ. शुभांगी कोपरकर यांनी डॉ. आपटे वसतिगृहात घेतलेल्या या कार्यशाळेत सर्व पर्यवेक्षक, कार्यकर्ते आणि पदाधिकारी सहभागी झाले.

दोन दिवसांच्या या कार्यशाळेत पहिल्या दिवशी डॉ. कोपरकर यांनी सांगितले की, आपले सर्वांचे ध्येय प्रथम विद्यार्थी, मग संस्था, नंतर कर्मचारी आणि शेवटी मी असे आहे. विद्यार्थी विकासासाठी आपले सर्वांचे एकत्रित प्रयत्न असायला हवेत. त्यासाठी कार्यक्षमता वृद्धी, संवाद कौशल्य वाढविणे गरजेचे आहे. श्री. कोपरकर यांनी कार्यशाळेत दुसऱ्या दिवशी कामाच्या प्राधान्यक्रमाबाबत मार्गदर्शन केले. आपण जे काम करतो त्याची अत्यंत महत्त्वाचे आणि घाईचे, महत्त्वाचे पण कमी घाईचे, घाईचे पण कमी महत्त्वाचे आणि दोन्ही नाही, अशी विभागणी करावी, त्यामुळे कामाचा ताण येणार नाही, हे समजावून सांगितले.

डॉ. कोपरकर दाम्पत्याने सामाजिक जाणिवेतून कोणत्याही मानधनाची अपेक्षा न ठेवता किंबहुना सर्व खर्च स्वतः करून ही कार्यशाळा घेतली. त्यांच्या अनुभवाचा आणि व्यासंगाचा फायदा समिती परिवाराला निश्चित लाभदायी ठरेल.

## नवीन वसतिगृहातील मुली पोस्टर प्रदर्शन स्पर्धेत द्वितीय

मराठी विज्ञान परिषद, पुणे विभाग आयोजित आंतरशालेय व आंतरमहाविद्यालयीन पोस्टर प्रदर्शन स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेत मुलींच्या नवीन वसतिगृहातील (बी विंग) सुरभी मांढरे, सानिका येलमाटे, सृष्टी डोईजड, श्रुती लोखंडे व पर्णवी मस्के या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक पटकावला. यंदाचा स्पर्धेचा विषय होता ‘एक नवे व्यसन– बालकांपासून थोरांपर्यंत.’ या स्पर्धेसाठी दुर्गेश पवार यांचे मुलींना मार्गदर्शन लाभले, तर संदर्भासाठी तुषार रंजनकर यांचे ‘मोबाईल व्यसनमुक्ती’ हे पुस्तक मार्गदर्शक ठरले. या मुलींनी पहिल्या फेरीत पीपीटी सादरीकरणाद्वारे ठसा उमटविला. दुसऱ्या फेरीत भावे हायस्कूल, रेणुका स्वरूप आणि सौ. विमलाबाई गरवारे स्कूलमधील विद्यार्थ्यांपर्यंत संदेश पोहोचविला. गोखलेनगर येथील कुसाळकर पुतळा परिसरात प्रदर्शन आयोजित केले.




## अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांशी अजित गटे यांचा संवाद

डिजिटेक रोबोटिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे अजित गटे यांनी १ सप्टेंबर रोजी समितीतील अभियांत्रिकी पदवी आणि पदविकेच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री. गटे म्हणाले, हे शतक टेक्नॉलॉजीने भरलेले आहे. तुम्हाला फक्त अप्लाय करायचे आहे. तंत्रज्ञान बदलत आहे, ते शिकत स्वतःचा विकास साधा. एआय, मशीन लर्निंग तंत्रज्ञान आत्मसात करा.

समितीमध्ये तुमच्या व्यक्तिमत्त्वाला पैलू पाडले जात आहेत. समितीत अनेक गोष्टी तुम्हाला सहज उपलब्ध होत आहेत. त्याचा फायदा घ्या, असेही त्यांनी सांगितले. डिजिटेक रोबोटिक्स कंपनीतर्फे विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी तयार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.